प्रशांत दांडेकर

# महफिल-ए-प्रशांत १

संगीतकार रवी, खैय्याम, नौशाद, जयदेव, ओ पी नय्यर, सी रामचंद्र



# महफ़िले-ए-प्रशांत

प्रशांत दांडेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

महफ़िले-ए-प्रशांत

प्रशांत दांडेकर

prashant.dandekar@rediffmail.com

9821947457

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor,

eternity

eastern express highway

Thane, 400604

प्रकाशन : ३ ऑगस्ट २०१५ (संगीतकार जयदेव जयंती)

©esahity Pratishthan®2015

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

माझे पहिले वहिले पुस्तक रसिकांना अर्पण करताना मनात खूप साऱ्या भावना दाटून आल्या आहेत.

आपल्या सभोवताली अनेक प्रतिभावंत असतात. कोणाच्या बोटांमध्ये जादू असते, तर कोणाच्या कंठामध्ये! कोणाच्या अंतरंगामध्येच इतकी प्रतिभा असते की अनेक उत्तमोत्तम शब्द, कल्पना, व व्हिज्युलायीजेशन ते स्वप्नांच्या दुनियेमधून वास्तवात आणतात. मला पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त करणाऱ्या अशा सर्व गायक, संगीतकार, गीतकारांना हे पहिले पुष्प अर्पण करताना मला अतीव आनंद होत आहे.

लेखकासाठी त्याचे प्रत्येक पुस्तक हे अपत्यच असते. लेखकाने पुस्तक लिहिताना ज्या प्रसव वेदना सहन केलेल्या असतात ते त्याचे त्यालाच ठावूक असते. माझे हे पहिले पुस्तकरूपी अपत्य माझ्या पहिल्या अपत्याला म्हणजे माझ्या मुलीला, नुपुरला देखील अर्पण करणे त्यामुळेच तर्कसंगत होईल

व सर्वात शेवटी म्हणजे माझ्या जनुकांमध्ये जी काही थोडी प्रतिभा आली आहे; ती जनुके मला भेट देणाऱ्या माझ्या माता-पित्यांना हे पुस्तक मी अर्पण करत आहे.

प्रशांत दांडेकर

# फ़नकार-ए-महफ़िल



# आगाज-ए-महफ़िल

रोजच्या धकाधकी च्या जीवनात आपण बरेचदा गर्दीत असून देखील एकटेच असतो. आपली बस किंवा कार ट्राफिक मध्ये अडकली आहे, ट्राफिक कधी क्लिअर होईल याची वाट बघत आपण कंटाळलो आहोत, अशा वेळी जर आपल्या कानावर एखादे सुरेल गाणे पडले तर नकळतच आपण 'ही वाट दूर जाते स्वप्नांमधील गावा' अशी अनुभूती घेतो

तर कधी कधी आपण खूप आनंदी असतो किंवा अतिशय दुःखी, उदास; आणि अशा वेळी आपल्याजवळ भावना व्यक्त करायला शब्दच नसतात. त्यावेळी जर 'आज मैं उपर, आसमा नीचे ' किंवा 'ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता' अशी गाणी सोबतीला आली तर आपल्या भावनांचा बांध फुटतो व मनाचे भरून आलेले आभाळ क्षणार्धात निरभ्र होते. आपला आवडता गायक किंवा गायिका, गीतकार किंवा संगीतकार अशाप्रकारे आपला क्षणाक्षणाचा सोबती असतो.

पण या सर्व प्रतीभावंताना देखील एक माणूस म्हणून आपल्या सर्वांसारखेच आशा निराशा, मान अपमान, सुख  दुःख यांच्या रहाट गाडग्यांमधून जावेच लागते

आजचे नवीन पिढीचे कलाकार प्रसिद्धीमाध्यमांच्या विपुलतेमुळे एका गाण्याच्या जोरावर रातोरात प्रसिद्ध होतात. पण मागच्या पिढीच्या लोकांचे तसे नव्हते. या प्रतिभावंत लोकांना अनेक कष्ट उपसावे लागले, पावलोपावली स्वतःला सिद्ध करावे लागले.


आपले आदर्श असणारे, आपले जीवन सुरमयी बनविणारे आपले संगीतकार कसे घडत गेले याचा अभ्यास हा माझा छंद आहे. माझ्याकडे जमा झालेली ही सगळी दौलत या पुस्तकांद्वारे उलगडण्याचा माझा मानस आहे. आपल्याला हे पुस्तक कसे वाटले ते कळायला मी उत्सुक आहे. माझ्याकडे प्रतिक्रिया पाठवणाऱ्यांना मी स्वतः पुढील पुस्तके पाठवत राहीन. मी तर खुप काही सांगू इच्छितो. तुम्ही ऐकताय ना.

माझा ई मेल पत्ता आहे prashant.dandekar@rediffmail.com व फोन नंबर आहे 9821947457.

तो हो जाये महफ़िल?

प्रशांत दांडेकर

## "आँखों में हमने आप के सपने सजाए हैं"




काही संगीतकारांचे संगीत वाळवंटातील ओएसिस प्रमाणे असते; तृषार्त मनाला तृप्त करणारे, कानाला गारवा देणारे... खय्याम  हे असेच एक संगीतकार. फिल्म आणि  टीव्ही इंस्टीट्यूट चे  डायरेक्टर पंकज राग,  आपल्या 'धुनों की माया' या पुस्तकामध्ये म्हणतात  .. जीवनातील धकाधकीत, तणावात, कोलाहालामध्ये जर थोडा विरंगुळा, शांती, समाधान शोधायचे असेल तर खय्याम साहेबांचे संगीत अनुभवा.

लहानपणापासूनच संगीताच्या प्रेमात आकंठ बुडालेला लहानगा खय्याम, याच वेडापायी शाळा सोडून पळून गेला होता. बाबा चिश्ती यांच्याकडे लाहोरला खय्याम यांनी संगीताचे प्राथमिक धडे गिरविले. संगीताच्या राजमार्गावर वाटचाल करण्यापूर्वी, खय्याम यांचा प्रवास अनेक पायवाटांवर झाला. कधी हीरो म्हणून तर कधी गायक म्हणून तर कधी सेनादलातील शिपाई म्हणून देखील. फिल्म रोमियो एंड जूलियट मध्ये त्यांनी अभिनय केला तर जौहराबाई अम्बालेवाली यांच्याबरोबर युगुलगीत देखील गायले

करिअरच्या सुरुवातीला त्यांनी शर्माजींच्या नावाने संगीत दिले. पण ते संगीत वर्माजी यांच्या जोडीने दिले गेले होते. हीर रांझा हा या जोडीचा पहिला चित्रपट होता. पण खऱ्या अर्थाने त्यांनी यशाची चव चाखली ते 'फिर सुबह होगी' या चित्रपटापासून. खरे तर राज कपूर अभिनय करत असल्याने या चित्रपटाला शंकर जयकिशन यांचे संगीत असणार होते



पण गीतकार साहीर लुधियानवी यांनी खय्याम यांच्या नावाचाच आग्रह धरला. आणि इतिहास घडला 'वो सुबह कभी तो आयेगी' या व इतर गाण्यांनी रसिकांना वेड लावले. गायिका आशा भोसले यांनी त्या रचना ऐकून त्याचवेळी खय्याम

यांना सांगितले होते कि, 'खय्यामसाहेब आपल्या संगीताची सुबह आता खऱ्या अर्थाने झालेली आहे'

'शामे गम कि कसम ' हे फुटपाथ मधील गाणे तलत - खय्याम या जोडीचे एक बेहतरीन गाणे आहे. फुटपाथच कशाला, शोला और शबनम, नुरी, त्रिशूल, शगुन, कभी कभी, बाजार, उमराव जान असे अनेक चित्रपट आहेत जे खय्यामच्या अद्भुत चालींनी सजले आहेत, नटले आहेत

खय्याम यांचे संगीत नेहमीच स्वर्गीय वाटले कारण त्यांनी ज्या गीतकारांबरोबर काम केले ते उत्तम शायर, कवी होते. जसे कि कैफी आझमी, साहीर, गुलजार वगैरे. गीताच्या अर्थपूर्ण, प्रवाही शब्दांना धक्का लागू नये म्हणून प्रसंगी खय्याम यांनी आपल्या चाली बदलल्या. सवंग तुकबाजी, यमक जुळले पाहिजे म्हणून काही तरी जुळवून आणलेली निरर्थक शब्द रचना त्यांनी नेहमीच नाकारली

खय्याम म्हणजे अभिजात संगीत हे समीकरण दृढ झाले होते म्हणूनच रफी साहेबांचे मोठे भाऊ ,हामिद एकदा त्यांच्याकडे आले व म्हणाले, " रफीसाठी तुम्ही असे काही खास बनवा कि त्याचे हुनर, कला अजरामर होईल, एका नव्या उंचीवर जाईल"

गीतकार दाग दहेलवी  यांच्या गझला मग खय्याम यांनी रफी साठी निवडल्या. त्या गझलांचे संगीत मग इतरांसाठी एक माईलस्टोन ठरला.



बेगम अख्तर यांना देखील खय्याम यांच्या संगीताची भुरळ पडली होती. त्यांच्या साठी मग "मेरे हम सफ़र मेरे हम नवा, मुझे दोस्त बन के दगा न दे" हि गजल खय्याम यांनी बनविली. खय्याम यांच्या संगीतामुळे, '६० वर्षांच्या मला, २४ वर्षांची झाल्या सारखे वाटले. खय्याम यांनी माझा आवाज इतका तरुण केला आहे' अशी कृतार्थ भावना त्यांनी व्यक्त केली यातच सर्व काही आले

खय्याम यांनी आपल्या संगीताला साज चढविण्यासाठी नेहमीच सर्वोत्तम सवंगडी निवडले. हरिप्रसाद चौरासिया हे त्यातीलच एक रत्न. खय्याम यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास जगात तीनच सर्वोत्तम बासरीवादक आहेत. पहिला कान्हा, दुसरा महान प्रेमी रांझा व तिसरे हरिप्रसाद. उमराव जान मधील 'काहे को ब्याही बिदेस' मधील हरिप्रसाद यांची बासुरी ऐकली कि खय्याम यांचे म्हणणे आपल्यास नक्की पटते



उमराव जान चे संगीत म्हणजे शब्दांपलीकडचा अनुभव आहे. या चित्रपटामधील वर उल्लेखलेले गाणे खय्याम यांच्या पत्नी म्हणजे जगजीत कौर यांनी गायले आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्री असते हे वचन इथे लागू पडते. कारण ज्या संगीतामुळे आशा भोसले यांना गायनाचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला त्या संगीतामध्ये खय्याम यांच्या सोबत त्यांच्या अर्धांगिनीचा पण मोठा सहभाग होता. "जिन्दगी जब भी तेरी बज्म में लाती है हमे " याची चाल आपल्या पत्नीची आहे हे खय्याम मोठ्या अभिमानाने जगाला सांगतात.

पण हि एकमेकांची साथ फार पूर्वी पासून म्हणजे 'शगुन' चित्रपटातील `तुम अपना रंझो गम अपनी परेशानी मुझे दे दो। तुम्हे गमकी कसम इस दिलकी विरानी मुझे देदो” पासून ची आहे हे फार कमी लोकांना ठावूक आहे. शगुनच्या या गाण्यातील भावना



एका पत्नीचे पतीवरील प्रेम व्यक्त करते. जगजीत कौर यांनी देखील हीच भावना आयुष्यभर खय्याम यांच्यासाठी बाळगली आहे.

खरे तर उमराव जान मध्ये 'दिल चीज क्या है', 'इन आखोंकी मस्ती के' सारखी अजरामर गाणी देणारे खय्याम सुरुवातीला खूप तणावामध्ये होते. पाकिजा मधील संगीत व उमराव जान मधील संगीत यांच्यात तुलना होऊन आपण त्यात कमी पडलो तर? हि त्यांची भावना होती. पण उमराव जान ने तोडीस तोड कामगिरी निभावली व त्यांचा जीव भांड्यात पडला. साहीर लुधियानवी हे तर खय्याम यांच्या प्रेमातच पडले होते त्याच मुळे संधी मिळाल्यावर ते त्यांचे नाव सर्व ठिकाणी पुढे करत.

कभी कभी चित्रपटासाठी खरे तर चोप्रा यांनी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांची निवड केली होती पण जेव्हा या संगीतकार जोडीने साहीर यांच्या गीतावर शंका उपस्थित केली तेव्हा साहीर यांनी लगेच खय्याम यांचे नाव पुढे केले. या संधीचा पुरेपूर फायदा उठवत खय्याम यांनी अप्रतिम संगीत देत त्यावर्षीचा फिल्मफेअर पुरस्कार पटकावला



आखरी खत मधील गाणी जशी कि.. 'बहारों मेरा जीवन भी सवारो', 'और कुछ देर ठहर', किंवा रजिया सुलतान मधील,'ए दिले नादान' सारखे गाणे खय्याम यांच्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख आहे. त्याच प्रमाणे "आँखों में हमने आप के सपने सजाए हैं" व

"हज़ार राहें मुड़के देखीं"  सारखी ‘थोडीसी बेवफाई’ या चित्रपटामधील मधील गाणी; खय्याम यांच्या चाहत्यांना आपल्या हृदयाजवळ वाटतात. थोडक्यात काय तर खय्याम यांचे संगीत कानावर पडले कि रसिकांची अवस्था  'फिर छिडी रात बात फुलोंकी' अशीच होते. १८ फेब्रुवारी आपल्या लाडक्या संगीतकाराचा वाढदिवस.. रसिक त्यांना शुभेच्छा देताना नेहमीच म्हणतील.. "जिन्दगी जब भी तेरी बज्म में लाती है हमे, ये जमीं चांदसे बेहतर नजर आती है हमे"



# तू अभीतक है हसीं

आपल्या नावाप्रमाणेच संगीत क्षेत्रामध्ये कधी काळी  तळपलेला  सुर्य म्हणजे संगीतकार रवि .  पण हा रवि म्हणजे मध्यान्हीचा आग ओकणारा सूर्य  नव्हता तर सूर्योदय किंवा  सूर्यास्ताच्या वेळचा मोहक , नारिंगी  वासरमणी होता



संगीतकार रवि म्हटले कि आठवतात एकसे एक चित्रपट जसे कि वक्त , निकाह , चौदहवी का चांद, गुमराह, आंखे व अजूनही कित्येक .

रवि हे आजूबाजूच्या गोष्टींमधून संगीत शिकले. वडिलांनी गायलेली भजने हा त्यांच्यावर झालेला पहिला संस्कार होता. कोणतेही रीतसर संगीत शिक्षण न घेतलेले रवि, एक दिवस सरळ उठून मायावी नगरी मध्ये आले. काही दिवस तर मालाड स्टेशनवर झोपून रात्री काढल्या

पण जसा प्रत्येक काळरात्रीच्या गर्भातून उद्याचा उष:काल होतो तद्वत एक दिवस प्रसिद्ध संगीतकार हेमंत कुमार यांना रवि नावाचा हिरा गवसला व रविसाहेबांची परवड थांबली. आनंदमठ या चित्रपटातील वन्दे मातरम या गाण्यासाठी हेमंतदांनी रवींच्या आवाजाचा वापर करून घेतला. हेमंत कुमार यांच्या बरोबर काम करत असताना त्यांचे चुकीचे होणारे उर्दू उच्चार दुरुस्त करण्याचे काम रविसाहेबांनी केले. हेमंत कुमार, रवि यांची गुणवत्ता जाणून होते व म्हणूनच आपल्या सावलीत राहून त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी रवि यांना स्वतंत्रपणे संगीत दिग्दर्शन सुरु करण्यास सांगितले.

आपली हक्काची मीठभाकर जाणार म्हणून रवि उदास झाले पण कालान्तराने हेमंत कुमार वागले ते योग्यच होते याचा साक्षात्कार त्यांना झाला



रवि यांनी वेगवेगळ्या प्रकारचे संगीत दिले पण लग्नाच्या संदर्भातील त्यांची गाणी विशेष लोकप्रिय झाली. मेरे यार कि शादी है सारखे जिगरी मित्राच्या तोंडचे गाणे असो कि बाबुल कि दुआएं लेती जा सारखे मुलीला सासरी पाठवताना वडिलांच्या तोंडचे गाणे असो; रवि साहेबांनी सामान्य लोकांचे सुख - दु :ख नेमक्या सुरांमध्ये स्वरबद्ध केले



इतकेच कशाला लग्न गाठी मध्ये बांधले गेल्यानंतर व सहजीवनाची २५ वर्षे घालवल्यानंतर जेव्हा नवऱ्याला बायकोची परत एकदा स्तुती करावीशी वाटते तेव्हा देखील रवि साहेबांचे वक्त मधील ए मेरी जोहरा जबीन गाणेच मदतीला येते व मैफिलीची शान वाढविते

रवि साहेब हे  चित्रपट संगीताच्या सुवर्ण काळाचे प्रतिनिधित्व करायचे त्यामुळे त्यांना आज कालचा रिमिक्स चा ट्रेंड बिलकुल पसंद नव्हता. ताजमहाल हा संगमरवरीच  शोभून दिसतो तो ग्रनाईट  मध्ये बनविण्याचा प्रयत्न जेवढा हास्यास्पद आहे तेवढाच हास्यास्पद प्रयत्न  माझे जुने गाजलेले गाणे रिमिक्स करण्यात आहे असे त्यांचे परखड मत होते


जेव्हा संगीतामध्ये  सूर ताल कमी होत आहे व गोंगाट वाढत आहे  हे त्यांना जाणवले तेव्हा स्वतःहून ते चित्रपट सृष्टीतून बाजूला झाले. पण त्यांचे असे रुसणे मल्याळम दिग्दर्शक हरिहरन यांना रुचले नाही. त्यांनी मग रवि यांना राजी करून बॉम्बे रवि या नवीन नावाने  त्यांना मल्याळम चित्रपट सृष्टीमध्ये सादर केले

हरिहरन यांच्या चित्रपटातील रवि यांचे संगीत एवढे कर्णमधुर होते कि चित्रा या गुणी गायिकेला उत्कृष्ट गायिकेचा राष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या मुळे प्राप्त झाला

वैशाली या हरिहरनच्या दुसऱ्या एका चित्रपटासाठी पण अशीच यशाची पुनरावृत्ती रवि साहेबांनी केली व चित्राला तिचा तिसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला



मल्याळम प्रमाणेच हिंदीमध्ये, निकाह मधील त्यांच्या कामगिरीमुळे सलमा आगा या अभिनेत्री कम गायिकेला पहिल्याच प्रयत्नामध्ये फिल्मफेअरचे उत्कृष्ट पार्श्व गायिकेचे अवार्ड मिळाले




रफीला चौदहवी का चांद साठी पहिले फिल्म फ़ेअर अवार्ड मिळवून देण्यामागे पण रवि साहेबांचेच संगीत होते

जी गोष्ट रफी साहेबांची तीच गोष्ट आशा ताईंची पण होती. त्यांना देखील पहिले अवार्ड मिळाले ते रवि साहेबांमुळेच... दस लाख या चित्रपटासाठी . ओ पी नय्यर यांच्या बरोबरच रवि साहेबांना आशाजींची कारकीर्द घडविण्यासाठी ओळखले जाते. जेव्हा इतर संगीतकार आशाचा आवाज फक्त सहनायिका किंवा खलनायिकेसाठी वापरत होते तेव्हा रवि साहेबांनीच त्यांचा आवाज नायिकेसाठी वापरला



जी गोष्ट रफी , लता व सलमा आगासाठी खरी होती तीच महेंद्र कपूर साठी देखील. गुमराह साठी त्यांना पहिले फिल्म फ़ेअर अवार्ड मिळवून दिले ते परत एकदा रवि साहेबांनीच. रवि असे सूर्य होते कि ज्यांनी कित्येकांना यशाची पहिली पहाट काय याचा प्रत्यय आणून दिला

रवि साहेबांना स्वतःला घराना व खानदान या चित्रपटांसाठी फिल्म फ़ेअर मिळाले. इतके सर्व पुरस्कार स्वतःला व इतरांना मिळवून दिल्यावरही त्यांना अभिजात संगीतकारांच्या श्रेणीत बसविले गेले नाही. समिक्षाकारांनी रवि साहेबांना पाहिजे तेवढे श्रेय दिले नाही पण तरीही रवि स्वतः कधी नाउमेद झाले नाहीत.

निकाह चित्रपटाला मुस्लिम संस्कृतीची पार्श्वभूमी असल्याने संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी नौशाद किंवा इतर कोणत्याही मुस्लिम संगीतकारांकडे द्या असे बरेच जणांनी चोप्रा यांना सांगितले पण चोप्रांनी या सर्व सूचनांना केराची टोपली दाखवली व रवि यांच्यावरच विश्वास दाखवला जो रवि साहेबांनी पण खरा करून दाखविला

अनेक यशस्वी गोष्टींपाठी रविजीच होते. नागीण मधील ती प्रसिद्ध बिन धून.... त्याचे जनक देखील रविच होते व म्हणूनच नागीण च्या यशानंतर हेमंत कुमार यांनी त्यांना कार भेट केली होती

रवि साहेबांना दिलेल्या बोलांना चाली लावायला खूप आवडायचे. त्यांनी कधीही आपल्या चालीवर इतरांना बोल लिहायची सक्ती केली नाही. शब्द जेव्हा रवि साहेबांकडे यायचे तेव्हा शब्दांच्या मनात हि बहुदा हीच भावना असायची कि 'हम जब सिमट के आपके बाहों में आ गए, लाखों हसीन ख़्वाब निगाहों में आ गए'



खरोखर रवि साहेबांचे संगीत म्हणजे स्वप्न नगरीची न संपणारी सहलच असायची. आपल्याला अशा सहलीवर घेऊन जाणारा हा हळुवार, तरल संगीतकार, स्वतः मात्र ७ मार्च २०१२ रोजी एकटाच दूरच्या प्रवासाला निघून गेला … 'चलो एक बार फिरसे अजनबी बन जाये हम दोनो' असे म्हणत

# दिल की मैफिल सजी है चले आईये



आपली सृजनशीलता जेव्हा काही कारणांमुळे जगापासून लपवावी लागते तेव्हा कलाकाराच्या आयुष्यात त्याच्यासारखे दुखः नसते. कारकीर्दीच्या सुरुवातीला असेच जहर प्यावे लागलेले एक संगीतकार म्हणजे नौशाद. संगीत दिग्दर्शनाचा पहिला वहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळविणाऱ्या या कलावंताचे आयुष्य म्हणजे एक सुरेल अनवट गाणे होते.

कट्टर मुस्लिम परंपरा जपणाऱ्या कुटुंबात जन्मलेल्या संगीतवेड्या नौशादला घरच्यांकडून कडवा विरोध झाला. घरात संगीत निषिद्ध असल्याने, नौशादला घर सोडण्यावाचून गत्यंतर नव्हते. मुंबईमध्ये ब्रौडवे सिनेमाच्या समोरील फुटपाथवर रात्री जागून काढताना नौशाद यांच्या मनात संगीताचेच विचार असायचे. त्या वेडापायी ते पियानो देखील वाजवायला शिकले



प्रेम नगर हा नौशाद यांचा पहिला चित्रपट होता. शारदा या चित्रपटापासून त्यांना यशाची चव चाखायला मिळाली. पण त्यांचे नाव खऱ्या अर्थाने गाजायला लागले ते रतन चित्रपटामुळे. लग्नात विघ्ने येऊ नये म्हणून नौशाद यांना सासरच्या लोकांना “मी एक शिंपी आहे” असे सांगावे लागले होते. पण स्वतःच्याच लग्नात जेव्हा वधू व वर दोघांच्याही अंगणात बैंडवाले रतन चित्रपटातीलच 'अंखियां मिला के जिया भरमा के चले नहीं जाना' सारखी गाणी वाजवू लागले तेव्हा त्यांची अवस्था अवघडल्यासारखी झाली. त्यात भर म्हणून जेव्हा होणाऱ्या सासरेबुवांनी या गाण्यांना नाके मुरडली तेव्हा या जावईबापूंची अवस्था अवघड जागेवरील दुखण्यासारखी झाली




बैजुबावरा जेव्हा ब्रौडवे चित्रपटामध्ये झळकला तेव्हा देखील प्रिमिअरला नौशाद यांना अशाच एका भावना कल्लोळाला सामोरे जावे लागले होते. फुटपाथाच्या एका कडेला त्यांचा खडतर भूतकाळ होता तर दुसऱ्या कडेला, येणारा सोनेरी भविष्यकाळ! रागदारी वर आधारित बैजू बावराच्या प्रत्येक गीताने रसिकांचे कान तृप्त केले त्यामुळेच मानाचा पहिला वहिला फिल्म फ़ेअर पुरस्कार नौशादजीना मिळणे म्हणजे फक्त औपचारिकताच होती

नौशाद यांच्याकडे चित्रपट संगीतामध्ये खूप काही सर्वप्रथम करण्याचे श्रेय जाते. जसे की 'आन' चित्रपटामध्ये सर्वप्रथम नौशाद यांनी १०० जणांचा वाद्यवृंद वापरला. चित्रपट गीतामध्ये पियानो वाजविणारा नायक सर्वप्रथम दिसला तो नौशाद यांच्या संगीतामुळेच. 'अंदाज' मधील गाण्यामध्ये 'तू कहे अगर जिवनभर मै गीत सुनाता जाऊं' हे ते पियानोवरील पहिले गाणे होते. अकोर्डीयन सर्वप्रथम हिंदी गाण्यामध्ये वापरण्याचा मानदेखील नौशाद यांच्याकडेच जातो. स्टुडियो मध्ये चहा, खुर्च्या यांची

व्यवस्था बघणारा श्याम कुमार जेव्हा संगीतामध्ये रुची घेत आहे हे नौशादजींना कळले तेव्हा त्यांनीच त्याला पार्श्वगायनाची सर्व प्रथम संधी दिली. चित्रपट होता दिल्लगी व सुपरहिट गाणे होते; 'तू मेरा चांद, मैं तेरी चांदनी'

नौशाद हे जसे एक प्रयोगशील संगीतकार होते त्याचप्रमाणे ते स्पष्टवक्ते पण होते. प्रसिद्ध गायक कुंदनलाल सैगल यांच्याबरोबर नौशाद यांना शाहजहाँ चित्रपटामध्ये काम करण्याची दुर्मिळ संधी मिळाली. 'जब दिल ही तुट गया' या गाण्याच्या वेळी सैगल यांनी दारू पिऊन गाणे रेकोर्ड केले. पण नौशाद यांना असे वाटले की दारू न पिता हे गाणे गायले गेले तर ते अधिक परिणामकारक होईल. त्यांनी तसे सैगल यांना पटवून दिले व या गाण्याचे परत एकदा रेकोर्डिंग केले. त्यांचा हा निर्णय किती योग्य होता हे रसिकांना काय वेगळ्याने सांगायला हवे का?

असेच एकदा मेहबूब खान यांच्या अनमोल घडी या चित्रपटाची रिहर्सल चालू होती. नौशाद नूरजहां यांच्यासोबत 'जवां है मोहब्बत हसीं है ज़माना, लुटाया है दिल ने ख़ुशी का खज़ाना' हे गाणे करत होते. तेव्हा मेहबूब तिथे आले व नौशाद यांना म्हणाले, "दाखव तू काय रचले आहेस ते" नौशाद यांनी त्यांना आपले संगीत ऐकवल्याबरोबर मेहबूब यांनी त्यातील काही म्युझिकचे पीस वगळण्याचे फर्मान काढले. नौशाद यांना ती लुडबुड बिलकुल आवडली नाही पण ते योग्य संधीची वाट पाहू लागले. जेव्हा त्यांचे हेच गाणे स्टुडियो मध्ये चित्रित होत होते तेव्हा ते मेहबूब व कॅमेरामन ईराणी यांच्या पाशी गेले व कॅमेरा मध्ये डोकावून हि फ्रेम अशी नको, हे असे चित्रित करा अशा सूचना देऊ लागले. तव्हा

मेहबूब यांनी त्यांना प्रेमाने समजावले, ' मियां जाओ जाओ, ये काम तुम्हारा नही, आप जाकर पेटी बजाव ' यावर नौशाद म्हणाले,"मला पण नेमके असेच वाटते, हे काम तुमचे आहे व ते काम माझे". मेहबूब यांना आता त्यांची चूक कळली होती





असाच एक किस्सा 'मेरे मेहबूब ' या चित्रपटाच्यावेळी घडला होता. नौशाद यांनी 'मेरे मेहबूब तुझे मेरी मोहब्बत की कसम' हे टायटल गीत फक्त ६ वाद्यांचा उपयोग करून बनविले होते. चित्रपटाचा निर्माता एच एस रवेल यामुळे खूप धास्तावला होता. त्याला वाटत होते की टायटल गीतच जर फ्लॉप झाले तर चित्रपट पण हमखास आपटणार. म्हणूनच त्याने नौशाद यांना अजून वाद्ये वापरण्याचे सुचविले त्यावर नौशाद यांचे उत्तर होते,'खीरीमध्ये साखरे ऐवजी मीठ टाकले तर चालेल का?' नौशाद यांना असे सांगायचे होते की गाणे कसे सजवायचे, कशाने सजवायचे हे त्यांना चांगलेच ठाऊक आहे व त्यांचा हा आत्मविश्वास किती खरा होता हे सर्व जगाला लवकरच कळले

नौशाद कोणत्याही भावना मनात दाबून ठेवायचे नाहीत. ज्या प्रमाणे त्यांनी आपली मते, नापसंती जरा ही भीड न बाळगता व्यक्त केली तद्वत शायर असलेल्या नौशाद यांनी लोकांचे कौतुक देखील तोंड भरून केले. सैगल यांची स्तुती करताना ते म्हणायचे, "ऐसा कोई फनकारे मुकम्मल नहीं आया, नग्मों का बरसता हुआ बादल नहीं आया, संगीत के माहिर तो बहुत आये है लेकीन, दुनिया में कोई दूसरा सहगल नहीं आया".आपल्या लाडक्या गायकाबद्दल, रफी बद्दल बोलताना नौशादजी अजूनच हळवे व्हायचे. रफी वर शेर करताना ते म्हणायाचे,"रफी हिंदुस्थानचे नवीन तानसेन आहेत. - गायकी था हुस्न-ए-फन तेरा रफी, तेरे फनपें हमें नाज है, मेरी सांसोमें तेरी आवाज है, मेरे गीतोंमे तेरी आवाज है!"



आधी म्हटल्याप्रमाणे नौशाद यांची ओळख प्रयोगशील संगीतकार म्हणून आहे. 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्यातील सुप्रसिद्ध अशा एको (पडसाद) इफेक्ट साठी त्यांनी लताजी यांना टाईल्स लावलेल्या बंद बाथरूम मध्ये गाण्याचा काही भाग गाण्यास सांगितले.

मोगल ए आजम या चित्रपटातीलच 'ए मोहब्बत जिंदाबाद'या गाण्यासाठी त्यांनी १०० जणांचा कोरस वापरला. तर उडन खटोला मधील 'मोरे सैंयाजी उतरेंगे पार हो, नादिया धीरे बहो' या पारंपारिक ठुमरीचे गाण्यात रुपांतर करताना त्यांनी वाद्यवृंद न वापरता फक्त कोरस मध्ये गाणाऱ्या गायकांकडून हमिंग करून घेतले व एक आगळाच परिणाम साधला.




चित्रपटाच्या कथेला पुढे नेण्यासाठी, नायक- नायिका यांचा अभिनयाचा मूड अधिक गहिरा करण्यामध्ये, बैक-ग्राउंड म्युझिक चे महत्व किती असते ते जाणणाऱ्यांमध्ये नौशादजी जाणकार होते. मुगल ए आजम, गंगा जमुना व पाकिजा ही तीनच उदाहरणे नौशाद जी यांचे या क्षेत्रातील योगदान अधोरेखित करायला पुरेशी आहेत

नौशादजी यांचे काम त्याकाळी एवढे प्रसिद्ध झाले होते कि ते नवोदित संगीतकारांसाठी एक मापदंडच बनून गेले होते. याचा अनुभव आपल्या पु ल देशपांडे यांना देखील आला होता. नवयुग स्टुडियो मध्ये जेव्हा पु ल स्वतःच्या चाली ऐकविण्यासाठी एका वितरकाला भेटले तेव्हा वितरकाला त्या चाली आवडल्या नाहीत. ‘पु ल तुम्ही नौशादजीं सारख्या चाली बनवा’ असा सल्ला त्या वितरकाने आपल्याला दिल्याची आठवण पु ल यांनी एका ठिकाणी सांगितली होती

नौशादजी एक भले व्यक्तिमत्व होते. आपला एकेकाळच्या सहाय्यक, गुलाम महम्मद यांनी 'पाकिजा' चित्रपटाला दिलेले संगीत त्यांच्या निधनामुळे अपूर्ण राहिले आहे हे जेव्हा नौशाद यांना कळले तेव्हा मोठ्या मनाने त्यांनी ती अपूर्ण जबाबदारी पूर्णत्वाला नेली

५ मे नौशाद यांचा स्मृतिदिन असतो. त्यांनी संगीत दिलेले गाणे कानावर पडले की रसिक नकळतच नौशाद जी यांना आठवून गुणगुणू लागतात.. दिल की मैफिल सजी है चले आईये, आपकी बस कमी है चले आईये

# तारीफ़ करूं क्या उसकी




ओ. पी. नय्यर हे नाव डोळयासमोर येताच आठवतात ती असंख्य उडत्या चालीची सुमधुर गीते. द किंग ऑफ ऱ्हिदम म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ओ पी नय्यर यांनी अनेक देणग्या चित्रपट संगीताला दिल्या . पण त्यांची एक खंत होती कि त्यांच्या या योगदानापेक्षा त्यांनी न केलेल्या गोष्टींमुळे ते नेहमी चर्चेत राहिले. ही न केलेली गोष्ट म्हणजे गानकोकिळा लता मंगेशकर यांची न घेतलेली साथ .

ओमकार प्रसाद नय्यर हे मुळचे लाहोरचे. पंजाबी मस्ती, ठसका, रुबाब, मस्तवालपणा हे सर्व काही गुणविशेष त्यांच्या स्वभावात व पर्यायाने संगीतामध्ये उतरले होते. याच मुळे कि काय लताचा पातळ आवाज आपल्या संगीताच्या बाजाला सूट होत नाही असे त्यांचे म्हणणे होते व त्याचवेळी त्यांना शमशाद बेगम यांचा मोकळा, ठसकेबाज , पहाडी आवाज

भुरळ घालायचा. शमशाद बेगम यांचा आवाज देवळातील घंटेप्रमाणे स्पष्ट व मधुर आहे असे त्यांचे प्रांजळ मत होते

ओ पी यांची चित्रपट कारकीर्द सुरु झाली ते कनीज या चित्रपटाचे पार्श्वसंगीत देऊन. त्यानंतर त्यांनी स्वतंत्र संगीतकार म्हणून केलेले 'आसमान' ,'छम छमा छम' आणि गुरुदत्तचा 'बाज' हे सिनेमे चाललेच नाहीत




निराश होऊन ओ पी नि आपला बाडबिस्तरा आवरायला घेतला होता . पण नय्यर साहेबांची गुरुदत्तकडे 'बाज'ची थकबाकी होती. ती द्यायला गुरुदत्तकडे पैसे नव्हते. 'बाज'ची गाणी तर हिट झालेली होती. म्हणून मध्यस्थाच्या सहाय्यानं या बदल्यात नय्यरनं गुरुदत्तचा पुढचा एक सिनेमा करावा आणि मग हिशेब करून त्यानंतर लाहोरला जावं, असं ठरलं.

आणी मग अवतरला तो ओ पी व गुरुदत्त या दोघांच्या आयुष्यातील तो सोनेरी क्षण ... आर पार.

गुरुदत्तनं ओ पी ना रेफरन्स म्हणून ‘बिंग क्रॉस्बी’च्या काही रेकॉड्र्स दिल्या आणि त्या धर्तीवरच  गाण्याच्या चाली बांधायला सांगितले.  त्यानुसार नय्यर यांनी  ‘आर पार’ची आठ गाणी केली

‘बाबूजी धीरे चलना’, ‘मुहब्बत कर लो जी भर लो’, ‘कभी आर कभी पार’, ‘ये लो मैं हारी पीया’, ‘हूँ अभी मैं जवाँ..’, ‘सुन सुन सुन सुन ज़ालिमा’  या सारख्या गाण्यांनी तरुणाईला भुरळ घातली.

एकदा ओ पी न विचारण्यात आले कि त्यांनी कधी कोणाच्या चाली उचलल्या आहेत का? तेव्हा प्रांजळ पणे त्यांनी सर्वांसमोर मान्य केले कि सून सून जालीमा, बिंग क्रॉस्बीच्या ‘सिंग सिंग सिंग सिंग अ साँग विथ मी’वर आधारित होते . पण त्यांनी हे हि पुढे आवर्जून सांगितले कि त्यांनी या गाण्यासाठी फक्त मुखडा उचलला आहे पण अंतरा हा सर्वस्वी त्यांचा आहे व त्यापुढे त्यांनी कधी हि कोणाला कॉपी केले नाही

पण हे कोणीही नाकारू शकत नाही कि पंजाबी ठेका व पाश्चिमात्य शैली यांचे हिंदुस्तानीकरण  ओ पी ने जसे केले त्या सारखे अजून कोणी हि करू शकले नाही.

टांगा बीट हि ओ पी यांचीच देणगी आहे .ओपी  नय्यरनी या ठेक्यात इतकी गाणी केलीत की, ज्या ज्या स्टुडिओत त्यांचं रेकॉर्डिंग होत असे तिथे तिथे टापांचा इफेक्ट काढण्यासाठी एक लादी नि करवंट्या ठेवूनच दिलेल्या असायच्या म्हणे! आठवून पहा पिया

पिया पिया मोरा  जिया पुकारे', 'यूं तो हमने लाख हंसीं देखे हैं', 'मांग के साथ तुम्हारा', 'बंदा परवर, थामलो जिगर'  सारखी  आशा रफीची गाणी .

ओ पी च्या गाण्यांचे अजून एक वैशिष्ट्य  म्हणजे त्यांच्या गाण्यात इन्ट्रो, इंटर ल्युड व  पोस्ट साँग म्युझिक हे हटकून असायचेच

टांगा बीट प्रमाणेच टाळ्यांचा सुरेल वापर ओ पीच करू जाणे . शक्यतो टाळ्या म्हटले कि आठवतात ती कव्वाली टाईप गाणी  किंवा भक्ती गीते पण या संगीतकाराने टाळ्या या कुठे हि वापरता येऊ शकतात हे दाखविले. टाळ्यांचे नाते हे आनंदाशी , उत्स्फूर्तता , मनापासून दिलेलि  दाद या सर्वांशी निगडीत असते . म्हणूनच कि




काय ओ पी यांनी याचा वापर 'मेरा नाम चिंचिंचू' अथवा 'हुजुरेवाला'सारख्या कॅब्रे नंबर्समध्ये, तसेच 'ये चांदसा रोशन चेहेरा' किंवा 'पुकारता चला हूं मैं' या रोमँटिक गाण्यात केला .

सारंगी , पियानो या सारख्या वाद्यांचा त्यांनी खूप मस्त पणे उपयोग करून घेतला. 'आपकी हसीन रुख पे  आज  नया नूर ' या गाण्यातील पियानो ची धून आज हि आपल्या कानात गुंजत असते नाही का ?

ओपींना शास्त्रीय संगीताचे ज्ञान नव्हते. आशा पारेखनं टीवीसाठी घेतलेली ओपीची एक  मुलाखत आहे त्यात, 'तुम्हाला चाल कशी सुचते? आणि तुम्ही शास्त्रिय संगीत शिकलेले नसताना  पूर्ण पणे राग व शास्त्रीय संगीतावर  आधारित चाली कशा देता?' या प्रश्नांना "वो तो खुदाकी देन है" असं  उत्तर त्यांनी  दिलय.

पण  यावर   विश्वास ठेवणे कठीण जाते ना  ! रागिणी चित्रपटातील छोटासा बालमा हि चाल ऐकल्यावर माझे म्हणणे पटेल तुम्हाला.  आपल्यालाच कशाला ओ पी यांचे घनिष्ट मित्र, उस्ताद अमीरखान यांना हि तसेच वाटायचे . त्यांची  व  ओपींची जानी दोस्ती होती, ओपीनी "देखो बिजली डोले बीन बादलकी" हे गाणं केल्यावर अमीरखान नाराज झाले. ओपींनी त्यांना नाराजीचं कारण विचारलं तर ते म्हणाले, " शास्त्रीय संगीत तू शिकलायस हे माझ्यापासून इतके दिवस का लपविलेस ?'" ओपी म्हणाले कशावरून? तर ते म्हणाले "हा  राग व हा ताल, व  असली रचना एखादा दिग्गजच करू शकतो" ओपी म्हणाले " आपल्या दोस्तीची शपथ, तुम्हाला सांगतो, त्या रागाचं नांव आणि असा काही ताल आहे हे तुम्ही सांगीतल्यावर मला आत्ता  समजलंय!"

पण ओ पींची प्रतिभाच अशी होती कि सगळे त्यांच्या पुढे नतमस्तक असायचे . संगीतासाठी त्याकाळी एक लाख बिदागी कोणी त्यांना असेच नाही द्यायचे.

पण ओ पी कमालीचे तत्ववादी , हट्टी व स्वतःच्या मर्जीनेच वागायचे. याच कारणामुळे त्यांचे रफी शी फाटले .

रेकॉर्डींगच्या दिवशी, सकाळी ठराविक वेळ झाली की, स्टुडिओचा दरवाजा आतून बंद केजा जाई. लेट कमर म्युझिशियन्सना प्रवेश नसायचा, मग ते कुणीही असोत. एकदा ‘सावन की घटा’च्या गाण्याचं रेकॉर्डिंग होतं. खुद्द रफ़ी साहेबांना खूप उशीर झाला होता. ते पोहोचू शकले नव्हते. रफीने क्षमा मागून मी खरोखरच शंकर-जयकिशनकडे अडकलो होतो, हे ओ पी ना खरे खरे सांगितलं. तेव्हा खवळलेले ओ पी म्हणाले, ‘‘तुला शंकर-जयकिशनसाठी वेळ आहे, पण माझ्या वेळेची पर्वा नाही त्यामुळे यापुढे तुझ्यासाठी नय्यरकडे हि वेळ नाही.’’

ज्या रफी शी ते असे वागले त्यांच्याविषयी त्यांना खरे तर खूप आदरच होता. 'गोड गळयाच्या मोहम्मद रफींना कडू कारली फारच आवडायची; पण कारल्यातील कडवटपणा त्यांच्या स्वभावात कधीही आला नाही,' ही टिप्पणी पण ओ पी यांनीच केली आहे . पुढे त्यांची व रफी साहेबांची दिलजमाई झाली


पण दोघांमधील भांडणामध्ये फायदा झाला तो महेंद्र कपूर यांचा. आंखो में कयामत के काजल', 'बहारें फिर भी आएंगी'सारखी प्लेझंट गाणी किंवा 'संबंध'मधली 'अंधेरे में जो बैठे हैं', ही गंभीर गाणी महेंद्र कपूरच्या वाट्याला आली ते याच मुळे. केवळ ओ पी यांच्या मुळेच एक वेगळा महेंद्र कपूर कानसेनांना ऐकायला मिळाला



पण ओ पी व आशा हे समीकरण केवळ स्वर्गीयचं होते . 'प्राण जाये पर वचन न जाये' यातील 'चैन से हमको कभी' हे गाणे आशाला फिल्म फ़ेअर अवार्ड देऊन गेले. पण फार पूर्वी पासून आशातील प्रतिभा ओ पी नि अशा प्रकारे जगापुढे आणली होती कि लोकांना तोंडात बोटे घालण्याशिवाय पर्यायच राहिला नव्हता. आठवून पहा 'आईये मेहेरबान', 'जाईये आप कहां जायेंगे' या सारखी गाणी .


पण आशा भोसलेच्या गाण्यांतील मुरक्या व हरकती यांच्याकडे लक्ष वेधून घेत ओ. पी. नय्यर नेहमी गर्वाने म्हणायचे, "ये आशाजी नही है, ये नय्यर है!" अशा अहमगंडामुळेच ओ पी यांचे अधःपत्तन सुरु झाले.

आर पार, मी. ॲन्ड मिसेस 55, सी आय  डी (आंखोंही आंखोंमे, लेके पहल पहला प्यार, कहीं पे निगाहें , ऐ दिल है मुश्किल जीना यहां, बुझ मेरा क्या नाम रे)  अशा चित्रपटांपासून सुरु झालेली यशाची कमान हळू हळू खाली उतरू लागली . पण ओ पिंचे संगीतातील योगदान हे कोणाला हि अमान्य करता येणार नाही, अगदी त्यांच्या कट्टर शत्रूलाही. त्यांच्या याच कार्याला कुर्निसात करण्यासाठी भारतीय सरकारने त्यांच्यावर टपाल  तिकीट काढले





ओ पी चा  जन्म व मृत्यू दोन्ही जानेवारी महिन्यातच येतात. १६ जानेवारी ते २८ जानेवारी या काळात सर्व चेनल  वर  त्यांच्याच गाण्यांची मैफिल सजलेली असते. आमच्या सारख्या सामान्य रसिकांना मात्र ओ पी चे कोणते हि गाणे ऐकल्यावर हेच शब्द आठवतात ... आप युंही अगर हमसे मिलते रहे देखिये एक दिन प्यार हो जायेगा.

# नवरंग उधळणारा अवलिया - सी रामचंद्र



काही संगीतकार असे होऊन गेले कि त्यांनी कानसेनांना भरभरून मेजवानी दिली. सी रामचंद्र असेच एक नाव! त्यांच्या चाहत्या वर्गाचे त्यांच्याप्रती प्रेम इतके निस्सीम होते कि देव्हाऱ्यामध्ये श्री राम व हृदयामध्ये सी रामचंद्र असे सरळसाधे समीकरण असायचे. आपले अण्णा मायावी नगरीत आले होते ते नायक बनण्यासाठी. नागानंद चित्रपटामध्ये त्यांनी भूमिका पण साकारली. पण मिनर्व्हा मुव्हीटोन च्या सोहराब मोदी नी सर्वप्रथम, अण्णा हे हिरो मटेरियल नसून संगीत दिग्दर्शक आहेत हे अचूक हेरले. सोहराब यांच्यामुळेच सी रामचंद्र हुगन नावाच्या संगीतकाराच्या संपर्कात आले. हुगन हे पाश्चात्य वाद्यांवर हिदुस्तानी संगीत वाजवू शकायचे. पण आपल्या अण्णा नी नेमका उलट विचार केला. पाश्चात्य उडत्या चाली देसी संगीतासाठी वापरायचा त्यांनी धाडसी निर्णय घेतला.

उडत्या चाली म्हणजे तरुणाई झिंगणार हे अण्णा ना पक्के ठावूक होते. आपले मित्र भगवान यांच्यामुळे अण्णा ना ब्रेक मिळाला. हा ब्रेक होता जयकोडी या तमिळ चित्रपटासाठी. पण अण्णा रातोरात लाईम लाईट मध्ये आले ते शहनाई चित्रपटातील आना मेरी जान संडे के संडे या गाण्यामुळे. अलबेला, अनारकली, आजाद, नौशेर ए आदिल, आशा, नवरंग, स्त्री हे सप्तसूर मग सर्व दिशांना घुमू लागले व अण्णा यांचे नाव सर्वतोमुखी झाले. गजानन जागीरदार यांना सी. रामचंद्र हे चितळकर नावाचे मराठी संगीतकार आहेत हे ठावूक नव्हते. त्यामुळेच मराठी कलाकारांच्या मैफिली मध्ये ते उद्विग्न पणे म्हणाले की एक दक्षिणात्य संगीतकार सगळी कडे धुमाकूळ घालत आहे आपण सर्वांनी काही तरी केलेच पाहिजे




आपले अण्णा प्रयोगशील संगीतकार होते. स्केट सिंगिंग हा प्रकार भारतामध्ये प्रथम आणला तो त्यांनीच. आधा है चंद्रमा द्वारे महेंद्र कपूर ना पहिली संधी दिली ती देखील त्यांनीच. याच माणसाने अनारकली मध्ये 'जमाना ये समझा के हम पिके आए ' या गाण्यात उचकीचा वापर केला. सुधीर फडके यांच्या पत्नी ललिता यांचा कल्पक उपयोग करून घेतला ते याच संगीतकाराने.

सी रामचंद्र हे खरोखरच दैवी प्रतिभेचे संगीतकार होते.  आजाद चे निर्माते नायडू यांना चित्रपटाची गाणी ३० दिवसांमध्ये पूर्ण करून हवी होती. नायडू यांनी नौशाद यांना तशी विनंती केली व त्यासाठी अधिक पैसे मोजण्याची तयारी पण दाखविली. पण नौशाद म्हणाले मी दबावाखाली काम करू शकणार नाही




नायडू मग जरा नाईलाजानेच अण्णा यांच्याकडे गेले. या संगीतकाराने ३० दिवस खूप झाले असे फक्त ७ दिवसांमध्ये सर्व गाणी पूर्ण केली. असेच काहीसे अनारकली या चित्रपटाबद्दल झाले. आपल्या अनारकली चित्रपटाला झांझर या चित्रपटामुळे अण्णा दुय्यम वागणूक देत आहेत व त्यामुळे अनारकलीचे काम रखडत आहे या गैरसमजापोटी निर्मात्याने सी रामचंद्र यांना कायदेशीर नोटीस पाठविली. पण अण्णा थोडेच हार मानणार होते. त्यांनी गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता फक्त एका दिवसामध्ये चार चाली बांधल्या


अनारकली च्या या चाली इतक्या उच्च  दर्जाच्या होत्या कि मजरूह सुलतानपुरी यांनी एका जागी असे म्हटले आहे कि अनारकली च्या चालींवरूनच नौशाद गजलांना चाली देण्यास शिकले आहेत.

आपले गाणे ज्या सेट वर चित्रित होणार आहे तो सेट गाण्याच्या प्रकृतीशी एकरूप झाला पाहिजे हा अण्णा यांचा हट्ट असायचा. परछायी हा व्ही शांताराम यांचा चित्रपट; त्याला अण्णा संगीत देणार होते. 'मुहब्बत ही जो न समझे' या गाण्याची नाळ सेट बरोबर जुळत नाही हे कळल्यावर आर्थिक नुकसान झाले तरी चालेल पण हा सेट बदला असा हट्ट त्यांनी शांताराम बापूंकडे केला. जो अर्थातच पुरविला गेला.

सी रामचंद्र यांचा आवडता राग होता बागेश्वरी पण अण्णा सर्व प्रकारचे लोकसंगीत वापरण्यात पण माहीर होते. नवरंग मधील आ दिल से दिल मिल साठी त्यांनी विशुद्ध मराठी ताल तर अनारकली 'ए बादे सबा आहिस्ता चल ' साठी त्यांनी पंजाबचा पारंपारिक हीर लेहजा वापरला

आपला आवडता गायक तलत उपलब्ध नसल्यास अण्णा स्वतः गायकाच्या रोल मध्ये शिरायचे. कितना हसीन  है मौसम, शोला जो भडके अशी गाणी खुद्द अण्णा यांच्या आवाजात ऐकताना एक वेगळीच मजा येते

गायक, संगीतकार सी रामचंद्र यांची अजून एक खासियत म्हणजे ते अत्यंत दिलदार होते. गरिबीतून वर आलेल्या लक्ष्मीकांतवर त्यांचे विशेष प्रेम होते. दोस्ती चित्रपटासाठी एल पी ना पहिलेवहिले फिल्मफ़ेअर अवार्ड जाहीर झाले. जेव्हा हे अण्णांना कळले तेव्हा त्यांनी आपल्या टेलर कडून भरजरी सूट लक्ष्मीकांत व प्यारेलाल यांच्यासाठी शिवून घेतले. प्रयोजन एकच.. समारंभाला एल पी यांनी मोठ्या रुबाबात ती ट्रॉफी स्वीकारावी




मराठी पुरते बोलायचे झाल्यास अण्णांचा परिस स्पर्श लाभला तो धनंजय व घरकुल या चित्रपटांना. ‘पप्पा सांगा कुणाचे’ हे छोट्यांचे गाणे असो कि ‘मलमली तारुण्य माझे’ सारखे सेन्शुअस गाणे असो.. ह्या देणग्या आहेत आपल्या लाडक्या अण्णा यांच्याच. 'नंबर ५४ द हाउस विथ बांबू डोअर' या गाण्याच्या श्रेयामध्ये देखील सी रामचंद्र आहेतच की. पण ते इतिहासात अजरामर झाले ते 'ए मेरे वतन के लोगो' या राष्ट्रभक्तीपर गीताने

सी रामचंद्र इतके अद्भुत व्यक्तिमत्व होते कि त्यांचे चरित्र लिहावेसे वाटले ते ग दि मा या अजून एक प्रतिभावंताला. 'माझ्या जीवनाची सरगम' या नावाने गदिमा यांनी अण्णांचे जीवन रसिकांसमोर आणले

कलावंताचे व्यक्तिमत्व त्याच्या कलाकृतीमध्ये उतरते असे सर्वसाधारण पणे म्हटले जाते पण सी रामचंद्र यांची बात काही औरच होती. अलबेलाची गाणी त्यांच्या खट्याळ पणाची साक्षी होती तर ‘धीरे से आजा रे अखियन मे’ सारखी भावविभोर अंगाई

त्यांच्यातील मायेची ऊब दर्शविते. 'तारो की जुबान पर है मोहब्बत की कहानी' सारखे प्रेमगीत असो कि 'देख तेरे संसार कि हालत' सारखे डोळयांमध्ये झणझणीत अंजन घालणारे वास्तव असो.. अण्णा नी नेहमीच आपल्या संगीतामधून नवरंग उधळले

सी रामचंद्र यांचा जन्म व मृत्यू दोन्ही जानेवारी महिन्यातलाच; १२ जानेवारी जन्मदिन तर ५ जानेवारी पुण्यतिथी. सी रामचंद्र म्हटले की आठवतं गाणे.. आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाये तेरी मेरी बात आधी मुलाकात आधी. कारण सरळसोट आहे, सी रामचंद्र हि अशी आख्यायिका कि जी कधीच पूर्ण होऊ शकत नाही.



# अभी ना जाओ छोडके के दिल अभी भरा नहीं


जयदेव एक मनस्वी संगीतकार ; ज्यांचे काम थोडे आहे पण जे काही आहे ते त्यांच्या रसिकांसाठी अक्षय ठेव आहे



जयदेव पण इतरांसारखे, हिंदी चित्रपट सृष्टीमध्ये हिरो व्हायला आले होते एक पण झाले भलतेच. वयाच्या १५ व्या वर्षी अभिनेता बनायचे खूळ डोक्यात घेऊन लहानगा जयदेव मुंबईला पळून आला. बाल कलाकार म्हणून वाडिया फिल्म कंपनीमध्ये ८ चित्रपटांमध्ये कामे देखील केली.

पण दैवाने त्यांचे मानाचे पान संगीत क्षेत्रामध्ये वाढून ठेवले होते. होतकरू जयदेव यांनी सचिनदा यांच्याकडे सहाय्यक संगीतकार म्हणून काम केले. 'टॅक्सी ड्रायव्हर' मध्ये त्यांनीच सहाय्यक म्हणून सचिनदा यांना मदत केली होती.

पण स्वतंत्र संगीतकार म्हणून ते नावारूपाला आले ते नव केतनच्या ' हम दोनो' या चित्रपटामुळे. 'अल्ला तेरो नाम' हे सुंदर भजन व 'अभी ना जाओ छोडके' सारख्या गाण्यांनी जयदेव कोणत्या मातीचे बनले आहेत याची रसिकांना जाणीव झाली. अल्पावधीतच 'मुझे जिने दो' या चित्रपटामुळे ते परत सर्वांच्या नजरेत भरले.




चित्रपट संगीतामधील सर्वात प्रसिद्ध मंगेशकर घराणे यांच्यावर जयदेव यांची मोहिनी पडायला फारसा वेळ पडला नाही. मदन मोहन , सलिल चौधरी व जयदेव असे तीन संगीतकार लता दीदींना वैयक्तिकरीत्या खूप पसंत होते. हृदयनाथ हे सलिल चौधरी व जयदेव या दोघांमुळे खूप प्रभावित झाले आहेत असे जाणकार सांगतात. आशा ताईंची कन्या वर्षा भोसले यांच्या मते त्यांची आई ओ . पी. नय्यर व राहुलदा यांच्यापेक्षा जयदेव यांच्याकडे खूप चांगली गायली आहे.' मांग मे भर ले रंग सखी रे ' हे ‘मुझे जिने दो’ मधील

वर्षा यांना जयदेव - आशाचे आवडलेले गाणे आहे . आशा भोसले यांचा तर जयदेव यांच्यावर विशेष स्नेह होता. म्हणूनच कि काय जयदेव यांच्या निधनानंतर आशाजी यांनी त्यांच्या अप्रकाशित संगीत रचनांवर आधारित 'सुरांजली' हा अल्बम काढला



मंगेशकर घराणेच कशाला स्वर भास्कर पंडित भीमसेन जोशी यांना देखील जयदेव यांच्याबद्दल नितांत आदर होता. हि गोष्ट आहे अमोल पालेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'अनकही ' चित्रपटाची. पालेकर पंडितजींकडे गेले व म्हणाले, “मी एक सिनेमा करतोय ‘अनकही’ नावाचा. तुम्ही त्यासाठी दोन भजने गावीत एवढीच विनंती आहे." कथा, व्यक्तिरेखा ऐकून घेतल्यानंतर पंडितजींनी विचारलं, ‘म्युझिक कोण देतंय?’ पालेकरांनी ‘जयदेव’ असं सांगताच कानाच्या पाळीला हात लावत पंडितजी उद्गारले, ‘फार मोठा संगीतकार आहे. मी जरूर गाईन. फक्त माझी एकच अट आहे. जयदेवजींनी मला गाणं नीट शिकवायला हवं. माझी नीट तालीम त्यांनी करून घ्यावी.’

पालेकरांनी पंडितजींची विनंती जेव्हा जयदेव यांच्या कानावर घातली तेव्हा जयदेवजींच्या डोळ्यांत पाणीच तरारलं. तेही जोमाने तयारीला लागले. ‘रघुवर तुमको

मेरी लाज' आणि 'ठुमक ठुमक पग' ही दोन भजनं भीमसेन यांच्यासाठी त्यांनी बनवली. गाण्यांची तालीम पालेकर यांच्याच घरी झाली. 'मी तुमचा नवखा शिष्य आहे, असं समजून मला शिकवा. गाण्यातली प्रत्येक जागा न जागा मला समजावून सांगा,' असं पंडितजींनी जयदेवजींना निक्षून सांगितलं. जयदेव व पंडित भीमसेन जोशी म्हणजे दुग्ध शर्करा योग त्यामुळेच अनकही'ला त्या वर्षीचे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. एक जयदेव यांना, तर दुसरा अर्थातच भीमसेनजींना

स्वतः जयदेव जी रत्नपारखी होते. १९७६ साली सूरसिंगार नावाच्या संगीत स्पर्धेचे जयदेव जी परीक्षक होते. त्यात त्यांनी सुरेश वाडकर या होतकरू गायकाला विजेता म्हणून निवडले. ते यावरच न थांबता त्यांनी या गुणी कलाकाराला आपल्या गमन सिनेमामध्ये गायची संधी पण दिली. 'सिने में जलन' हे गाणे सुरेशजींच्या करिअरमधील एक माईलस्टोन गाणे आहे. 'आपकी याद आती रही' या गमन मधील गाण्यासाठी छाया गांगुली या त्यामानाने अपरिचित असलेल्या गायिकेला सर्वोत्तम गायिकेचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला ते फक्त जयदेव यांच्याच मुळे.



रुना लैला या भारतीयांसाठी नवख्या असलेल्या गायिकेला पण त्यांनी सुंदर गाणी गायला दिली. 'जिंदगी मेरे घर आना' असे म्हणणारा 'दूरियाँ' मधील भूपिंदर असो की 'एक अकेला इस शहर में' गाणारा 'घरोंदा' मधील भूपिंदर ... प्रत्येक ठिकाणी जयदेव टच हा रसिकांना जाणवतोच

जयदेव हे प्रयोगशील संगीतकार होते. मीरा बाईंचे भजन,'मैं जानूं नाही' त्यांनी एकाचवेळी आशा व लता यांच्याकडून गाऊन घेतले. चांद ग्रहण या चित्रपटासाठी लता गायली तर आंदोलन साठी आशा गायली. जयदेव यांचा आवडता स्वर गंधार होता. त्यांच्या गाण्यांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गाण्यांत अंतऱ्याची शेवटची ओळ मुखडय़ाला अलगद अजोड, अतूट धाग्याने विणलेली असते. हि जोड इतकी स्वाभाविक असते की ती खटकतच नाही . बासरी, सरोद हि त्यांची आवडती वाद्ये होती

जयदेव यांची दुसरी ठळक ओळख म्हणजे हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशाला च्या काही रचनांना दिलेले त्यांनी संगीत. मन्ना डे यांचा भारदस्त आवाज, हरिवंशराय यांचे बोल व जयदेव यांचे संगीत असा हा त्रिवेणी संगम अनोखा असणारच. आलाप चित्रपटाला संगीत जयदेव यांचे होते तर त्यातील एक प्रसिद्ध गीत 'कोई गाता मैं सो जाता' याचे शब्द हरिवंश राय बच्चन यांचेच होते

पण या गुणी संगीतकाराची खूप उपेक्षा करण्यात आली. संगीताचे नाणे खणखणीत असून देखील खिशात मात्र पैसा कधीच खुळखुळला नाही. हम दोनो सारखे संगीत देऊन सुद्धा देव आनंदला त्यांना रिपीट करावेसे वाटले नाही.

घरभाडे द्यायची ऐपत नसलेल्या जयदेव यांच्यावर रस्त्यावर यायची नौबत आली. लता मंगेशकर पुरस्कार मिळाला पण त्याचे पैसे हातात पडण्यापूर्वीच देवाचे बोलाविणे आले. त्यांच्याच संगीताने नटलेल्या शब्दांमध्ये सांगावयाचे झाल्यास 'कभी खुद्पे कभी हालात पे रोना आया' अशीच काही स्थिती होती पण या संगीतकाराने रसिकांना मात्र नेहमीच आपल्या स्वर रचनांचे वैभव दाखविले.



३ ऑगस्ट जयदेव यांची जयंती. पण त्यांचे संगीत जेव्हा केव्हा कानावर पडते तेव्हा रसिकांना म्हणावेसे वाटते कि .. अभी ना जाओ छोडके के दिल अभी भरा नहीं

# अंजाम-ए-महफ़िल



असं एखादं छानसं पुस्तक वाचून संपताना आपली “ अभी न जाओ छोडकर-के दिल अभी भरा नहीं “ अशी अवस्था होतेच. पण प्रत्येक मैफ़लीची सांगता होतेच. याही महफ़िलीची सांगता 'फ़िर मिलेंगे' च्या नोटवर होत आहे. ही मैफ़ल तुम्हाला कशी वाटली ते prashant.dandekar@rediffmail.com किंवा esahity@gmail.com वर कळवा.

आपल्या प्रतिक्रियांवरूनच पुढल्या मैफ़लीची आखणी सुरू होईल. त्यात मग मदनमोहन, सलील चौधरी, सचिनदा, राहुलदा, हेमंतकुमार, रफ़ी, किशोरदा, लतादिदी, आशाजी, साहिर, जावेद अख्तर, शंकर जयकिशन, लक्ष्मीकांत प्यारेलाल, गुलजार अशा एक से एक दिग्गजांची मैफ़ल रंगवू. सारे काही आपल्या वाचकांच्या प्रतिक्रिया आणि फ़र्माईशींवर अवलंबून राहील. तेव्हा आपल्या प्रतिक्रिया लवकर येऊ द्यात. फ़ेसबुकवर esahity च्या पेजवर किंवा प्रोफ़ाईलवरही आपण आपल्या प्रतिक्रिया नोंदवू शकता.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. हिंमते मर्दा. मददे खुदा. किंवा हल्लीच्या भाषेत सांगायचं तर सच्ची लगन हो तो अपने सपने हासिल करनेके लिये सारी कायनात एक हो जाती है. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. या आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. आजचे हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला ते जाणवेलच.

पण आम्ही समाधानी नाही. बारा कोटींच्या या मराठी समाजात किमान एक दोन कोटी तरी समंजस, चोखंदळ वाचक असायला हवेत. ज्ञानोबा तुकोबांच्या संस्कारांत वाढलेल्या या समाजाकडून एवढी अपेक्षा ठेवायला काय हरकत आहे? मित्रहो. ज्योतीने ज्योत तेवत जावी. तसे वाचकांनीच वाचक जोडायला हवेत. तुम्हाला जर हे स्वप्न पूर्ण होण्यात हातभार लावावासा वाटत असेल तर फ़क्त एवढेच करा. आपल्या ओळखीपाळखीतल्या किमान दहावीस लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही VIP वाचक दर्जा देतो.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

अधिक माहितीसाठी भेट द्या : www.esahity.com

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान